आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप!
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

पान ३
धोकादायक वाड्यांना मनपाकडून नोटिसा
जिल्हा प्रशासनाकडून मान्सूनपूर्व तयारीच्या सूचना
नाफेडच्या कांदा खरेदीची चौकशी व्हावी
पान ८
पंचवटीत टोळक्याचा हैदोस
लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार
दहा लाखांचे दागिने लंपास

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ | अंक २३६ | रविवार, दि. ४ मे २०२५ | पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा Android व Apple वर

## थोडक्यात

### राज्याचे तीन मंत्री इटलीच्या दौऱ्यावर

**मुंबई ।** इटलीत आयोजित करण्यात आलेल्या मॅकफ्रूट प्रदर्शनाला उपस्थित राहण्यासाठी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह तीन मंत्री रविवारी (दि.४) इटलीच्या दौऱ्यावर रवाना होणार आहेत. इटलीतील रोमिनी येथे मॅकफ्रूट २०२५ हे जगातील एक प्रमुख आंतरराष्ट्रीय फळे आणि भाजीपाला प्रदर्शन दि. ६ ते ८ मे याकाळात आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाला माणिकराव कोकाटे यांच्यासह पणनमंत्री जयकुमार रावल आणि कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल हे भेट देणार आहेत. या तिन्ही मंत्र्यांचा दौरा दि. ४ ते ९ मे असा आहे.

### आठवडाभर अवकाळीचे सावट

**नाशिक ।** खान्देश, नाशिक, नगर पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, धाराशिव, बीड, नांदेड, गडचिरोली भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, अमरावतीसह २६ जिल्ह्यांत १० मेपर्यंत ढगाळ वातावरण तसेच किरकोळ पावसाची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी विशेष असे घाबरून जाऊ नये. केवळ सावधानता बाळगावी. या वातावरणाचा प्रभाव विदर्भातील सात जिल्ह्यांत विशेष जाणवू शकतो व एखाद दुसऱ्या दिवशी किरकोळ गारपिटीचीही शक्यता नाकारता येत नाही, असे हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी म्हटले आहे.

### गोव्यातील दुर्घटनेत सहा भाविकांचा मृत्यू



**शिरगाव ।** गोव्यातील देवी लईराईच्या यात्रेत झालेल्या दुर्घटनेत सहा भाविकांचा मृत्यू झाला असून जवळपास ५० पेक्षा जास्त भाविक जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी डिचोली आरोग्य केंद्र, म्हापसा जिल्हा रुग्णालय आणि गोमेकॉत उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या घटनेत मृतांचा आकडा वाढण्याचीही शक्यता वर्तवण्यात येत आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी घटनास्थळी भेट दिली. तसेच उत्तर गोवा जिल्हा रुग्णालय आणि डिचोली रुग्णालयाला भेट देऊन जखमींची विचारपूस केली.

### पुरंदरमध्ये आंदोलक-पोलिसांत धुमश्चक्री

**पुणे ।** पुरंदरमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला जमिनी देण्यास तालुक्यातील सात गावांतील ग्रामस्थांनी विरोध केला आहे. जमिनी मोजण्यासाठी आलेल्या पथकाला गावात जाण्यासाठी ग्रामस्थांनी मज्जाव केला. त्यानंतर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तसेच या धक्काबुक्कीत एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोपदेखील गावकऱ्यांनी केला आहे. अंजनाबाई कामठे असे या वृद्ध महिलेचे नाव आहे. पोलिसांनी आमच्यावर लाठीचार्ज केला आहे. आम्ही अतिरेकी आहोत का? अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. आमच्यावर गुन्हे दाखल केल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे.

# कठोर अन् निर्णायक कारवाई

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दहशतवाद्यांना इशारा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. सर्वच स्तरातून दहशतवाद्यांवर कठोर कारवाईची मागणी केली जात आहे. जगभरातूनही यासाठी भारताला पाठिंबा मिळत आहे. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांना सोडणार नसल्याचे म्हटले आहे. दहशतवाद्यांविरोधात कठोर आणि निर्णायक कारवाई करू, असा इशारा पंतप्रधान मोदींनी दिला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी हैदराबाद हाऊस येथे अंगोलाचे राष्ट्रपती जोआओ मॅन्युएल गोन्साल्विस लॉरेन्को यांची भेट घेतली. यादरम्यान, दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय बैठक घेत दहशतवादाच्या मुद्यावरून चर्चा केली. यानंतर राष्ट्रपती लॉरेन्को यांच्यासोबत संयुक्त पत्रकार परिषदेत पंतप्रधान मोदी म्हणाले की, दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्यांविरुद्ध ठोस आणि निर्णायक कारवाई करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत. सीमापार दहशतवादाविरुद्धच्या आमच्या लढाईत अंगोलाने दिलेल्या पाठिंब्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. दहशतवाद हा मानवतेसाठी सर्वात मोठा धोका आहे यावर आमचे एकमत आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या लोकांबद्दल राष्ट्रपती लॉरेन्को आणि अंगोला यांनी व्यक्त केलेल्या शोकसंवेदनाबद्दल मी त्यांचे आभार मानतो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अंगोलामध्ये



लष्कराच्या आधुनिकीकरणासाठी २०० दशलक्ष डॉलर्सच्या संरक्षण कर्जाला मान्यता दिली आहे. याशिवाय, संरक्षण प्लॅटफॉर्मची दुरुस्ती आणि पुरवठा यावरही करार झाला आहे. अंगोलाच्या सशस्त्र दलांच्या प्रशिक्षणात मदत करण्यास आम्हाला आनंद होईल. आम्ही अंगोलाला डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, अंतराळ तंत्रज्ञान आणि क्षमता बांधणीमध्येदेखील मदत करू, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

### भारतीय बंदरांवर पाकच्या मालवाहू जहाजांना बंदी

भारताने दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानची आर्थिक कोंडी करण्याचा निर्णय घेतला आहे. भारत सरकारने पाकिस्तानमधून कोणत्याही प्रकारच्या वस्तूंच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयातीवर तत्काळ बंदी घातली आहे. भारताने पाकिस्तानशी सर्व टपाल संपर्क निलंबित केले आहेत. पाकिस्तानी ध्वज असलेल्या जहाजांना भारतीय बंदरांमध्ये प्रवेश करण्यास बंदी घातली आहे. सरकारने शनिवारी यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे.

### मोदी-ओमर अब्दुल्ला भेट

पहलगाम हल्ल्यानंतर पहिल्यांदाच जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. ही भेट पंतप्रधानांच्या निवासस्थानी झाली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, साधारणपणे अर्धा तास चाललेल्या या बैठकीत दोन्ही नेत्यांनी हल्ल्यानंतरच्या परिस्थितीवर चर्चा केली.



◉ पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर अनंतनाग जिल्ह्यात माजी मुख्यमंत्री तथा जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सचे (जेकेएनसी) अध्यक्ष फारुख अब्दुल्ला यांनी काल पर्यटकांशी संवाद साधला. तसेच त्यांनी पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या आदिल हुसेन शाहच्या घरी जाऊन आदिलच्या कुटुंबाची भेट घेतली आणि त्याला श्रद्धांजली वाहिली.

## पाकची दर्पोक्ती

### ...तर हल्ला करू : संरक्षणमंत्री आसिफ

**इस्लामाबाद । वृत्तसंस्था**

भारताने सिंधू नदीवर धरण बांधले तर पाकिस्तान त्यावर हल्ला करेल, अशी दर्पोक्ती पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी केली आहे. एवढेच नव्हे तर आक्रमकता केवळ गोळ्यांद्वारे नसते, तर पाणी अडवणे हादेखील हल्लाच आहे, असेही आसिफ यांनी म्हटले आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान यांच्यातील तणाव शिगेला पोहोचला असतानाच ख्वाजा आसिफ यांचे हे वक्तव्य आले आहे. १९६० मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात जागतिक बँकेच्या मध्यस्थीने झालेला आयडब्ल्यूटी (सिंधू पाणी करार) हा आजपर्यंतचा जगातील सर्वात यशस्वी जल करार मानला जातो. या करारानुसार, भारताला पूर्वेकडील नद्यांवर (रावी, बियास, सतलज) नियंत्रण देण्यात आले, तर पाकिस्तानला पश्चिमेकडील नद्यांवर (सिंधू, झेलम, चिनाब) अधिक अधिकार मिळाला.

भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर अपेक्षित समर्थन मिळालेले नाही, असे पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांना वाटते. भारताचे आरोप आंतरराष्ट्रीय पातळीवर फेटाळण्यात आले असल्याचा त्यांचा दावा आहे. तसेच मोदी सरकारकडे आपले दावे सिद्ध करण्यासाठी कसलेही पुरावे नाहीत, असेही आसिफ यांनी म्हटले आहे.

### श्रीलंकेत विमानाची तपासणी

**कोलंबो ।** भारताकडून आलेल्या अलर्टनंतर श्रीलंकेत चेन्नईहून आलेल्या विमानाची तपासणी झाली. श्रीलंकन एअरलाईन्सचे विमान काल भंडारनायके आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचले. विमान उतरताच सुरक्षा दलाच्या जवानांनी त्याला वेढा घातला. यानंतर विमान आणि त्यातील प्रवाशांची कसून तपासणी करण्यात आली. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील संभाव्य संशयित त्यात असू शकतात, असा अलर्ट भारताकडून श्रीलंकेला देण्यात आला होता.

## शिर्डीचे साईबाबा मंदिर बॉम्बने उडवण्याची धमकी

**शिर्डी । वार्ताहर**

शिर्डीतील साईबाबा मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी साई संस्थानला ई-मेलद्वारे देण्यात आली आहे. हा धमकीचा ई-मेल आल्यानंतर सुरक्षा व्यवस्था अलर्ट झाली असून भाविकांच्या सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात येत आहे. साईबाबा संस्थानसह हजारो पोलिसांचा ताफा सज्ज असून साईभक्तांनी कोणतीही भीती न बाळगता दर्शनासाठी यावे, असे आवाहन साईमंदिर प्रशासनाने केले आहे.

**संस्थानला ई-मेल; गुन्हा दाखल**

शिर्डीतील साईबाबा हे लाखो भाविक-भक्तांचे श्रद्धास्थान आहे. हजारो भाविक दररोज साईबाबांचे आशीर्वाद घेण्यासाठी या मंदिरात जात असतात. मात्र शुक्रवारी सकाळी साई संस्थानच्या मेल आयडीवर एका अज्ञात व्यक्तीकडून धमकीचा मेल पाठवण्यात आला. आम्ही साईबाबा मंदिर बॉम्बने उडवू, असा उल्लेख या ई-मेलमध्ये करण्यात आला होता. साईबाबा संस्थानचे सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी यांनी शिर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून धमकीच्या पार्श्वभूमीवर साई मंदिराची बीडीएस आणि डॉग स्कॉडसह पथकाने कसून तपासणी केली आहे. साईमंदिराच्या सर्व प्रवेशद्वारांवर भक्तांचीही कसून तपासणी केली जात असून धमकीचा मेल पाठवणाऱ्या अजित जाकोमोला नावाच्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साईबाबा मंदिराचे हजारो सुरक्षा कर्मचारी आणि पोलीस पथक भक्तांची काळजी घेण्यास सक्षम असून देशभरातील साईभक्तांनी निश्चिंतपणे साईदर्शनाला यावे, असे आवाहन साईमंदिराचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी केले आहे.

## मोदींच्या चेहऱ्यावर ना दुःख, ना चिंता

### राऊत यांचा आरोप

**पुणे । प्रतिनिधी**



पहलगाम हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप नेत्यांच्या चेहऱ्यावर कोणतेही दुःख आणि चिंता दिसत नसल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला. दरम्यान, पाकिस्तानला पंतप्रधान मोदी धडा शिकवणार आहेत. पण कधी शिकवणार हेच समजत नाही. आम्हीच चिंतेत आहोत, ते पाकिस्तानला कसा धडा शिकवतील याची काळजी आम्हालाच आहे, असा चिमटाही राऊत यांनी काढला.

पुण्यामध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये राऊत बोलत होते. राऊत म्हणाले, पहलगाम हल्ल्याच्या घटनेनंतर पंतप्रधान तत्काळ बिहारला गेले. तिथल्या प्रचारात सहभागी झाले. त्यानंतर पंतप्रधान देशभरात टंगळमंगळ फिरत आहेत. मुंबईत नऊ तास नट-नट्यांसोबत हास्यविनोद करत आहेत. आंध्र प्रदेशचे नेते पान १० वर

## राज्याच्या अर्थखात्यात महाभाग बसले आहेत!



### शिरसाटांचा पवारांना घरचा आहेर

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थींना एप्रिल महिन्याचा हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास खात्याचा निधी वळवल्याच्या मुद्यावरून सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट प्रचंड संतप्त झाले आहेत. अर्थखात्यात शकुनी महाभाग बसले आहेत, अशा शब्दात त्यांनी शनिवारी वित्तमंत्री अजित पवार यांना घरचा आहेर दिला.

सरकारी तिजोरीत पैसे नसल्याने महायुती सरकारने सामाजिक न्याय आणि आदिवासी विभागाचा तब्बल ७४६ कोटी रुपयांचा निधी लाडक्या बहिणींसाठी वळवला आहे. वास्तविक या दोन खात्यातील निधी अशाप्रकारे वळवता येत नाही. पण तरीही हा निधी वळवल्याने सामाजिक न्याय खात्याचे मंत्री संजय शिरसाट संतप्त झाले आहेत.

अर्थखात्याकडून मनमानी सुरू आहे. अर्थखाते आपले डोके जास्त चालवत असेल तर हे बरोबर नाही. माझ्या विभागाचा निधी वर्ग किंवा कमी करता येत नाही. मुख्यमंत्र्यांच्या कानावर या सगळ्या गोष्टी मी घालणार आहे. अशा गोष्टी करणे कायदेशीर नाही. असे करणे चुकीचे आहे. अर्थखाते आपल्याला वाटते तेच खरे असे वागत आहे. याला माझा विरोध आहे. सहन करायची एक मर्यादा असते. यापेक्षा तुम्ही जास्त करत असाल तर मला वाटते की सरळ सर्वच निधी 'कट' करून टाका, अशा शब्दात संजय शिरसाट यांनी अजित पवार यांना लक्ष्य केले.

## आदिवासी भागात पन्नास हेक्टरवर विषमुक्त शेती

### मोगरे येथे १२५ शेतकऱ्यांचा हरितक्रांती नैसर्गिक शेती गट स्थापन

**बेलगाव कुऱ्हे । लक्ष्मण सोनवणे**

शासनाच्या राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाचे सकारात्मक परिणाम साध्य होताना दिसत आहेत. विषमुक्त अन्नदाता तयार होण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेऊन निसर्गावर आधारित शाश्वत शेती प्रणालीला प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभाग भर देत आहे. या महत्त्वपूर्ण अभियानाअंतर्गत कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली इगतपुरी तालुक्यातील मोगरे येथे १२५ शेतकऱ्यांनी एकत्र येत ५० हेक्टरचा नैसर्गिक शेतीशी निगडीत असलेला हरितक्रांती मोगरे नैसर्गिक शेती नावाचा गट स्थापन केला आहे. तालुक्यातील ५० हेक्टरवर विषमुक्त शेतीचा अवलंब शेतकरी बांधव करणार आहेत.

नैसर्गिक शेतीकडे शेतकरी बांधवांची वाटचाल सुरू पान १० वर



मोगरे (ता. इगतपुरी) येथे राष्ट्रीय नैसर्गिक शेती योजनेअंतर्गत ५० हेक्टरचा गट स्थापन करण्यासाठी मार्गदर्शन करताना मंडळ कृषी अधिकारी संतोष सातदिवे. समवेत कृषी पर्यवेक्षक आबासाहेब आटोळे, कृषी सहाय्यक रूपाली बिडवे, सरपंच प्रताप जाखेरे, कृषीमित्र देवराम केरू गवारी आदी.

### नैसर्गिक शेतीची उद्दिष्ट्ये

रासायनिक खते, कीटकनाशके आदींचा वापर थांबवून, जमिनीचे सेंद्रीय कर्ब वाढवून जमिनीची सुपीकता व आरोग्य सुधारणे. रसायनमुक्त, सुरक्षित, सकस व पोषणयुक्त शेतमाल उत्पादित करणे. नैसर्गिक शेतमालाची मूल्यसाखळी विकसित करणे. नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी जतन करणे. पीक उत्पादनात विविधता टिकवून ठेवणे. जमीन आणि नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर (प्रकाश, हवा, पाणी). कीटक आणि रोगांच्या जैविक नियंत्रणासाठी मातीतील नैसर्गिक फायदेशीर कीटक, प्राणी आणि सूक्ष्म जंतूंना प्रोत्साहन देणे. नैसर्गिक / स्थानिक संसाधन-आधारित निविष्ठांचा वापर. कृषी उत्पादनाचा खर्च कमी करणे.



निसर्गावर आधारित शाश्वत शेती प्रणालीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. शेतावर तयार केलेल्या नैसर्गिक निविष्ठांचा वापर करून बाहेरून निविष्ठा खरेदी न करणे व जमिनीचे आरोग्य सुधारणे अशी उद्दिष्ट्ये आहेत. उत्तम आरोग्याची खात्री नैसर्गिक शेतीमध्ये आहे. कोणत्याही कृत्रिम रसायनांचा वापर केला जात नसल्यामुळे आरोग्याला असलेले धोके दूर होतात. अन्नामध्ये उच्च पौष्टिक घनता असते. शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेती करणे गरजेचे आहे.

■ **अभिमन्यू काशीद,**
प्रकल्प संचालक (आत्मा)

## उत्तर महाराष्ट्रात शरद पवार पक्षाला धक्का

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जळगाव जिल्ह्यातील नेते आणि माजी राज्यमंत्री गुलाबराव देवकर, सतीश पाटील यांनी शनिवारी पक्षाला सोडचिठ्ठी देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या दोघांनी २०२४ ची विधानसभा निवडणूक अनुक्रमे जळगाव ग्रामीण आणि एरंडोलमधून लढवली होती. याशिवाय माजी आमदार कैलास पाटील, दिलीप पाटील, शरद पाटील यांनीही राष्ट्रवादीचा झेंडा हातात घेतला. या पक्षप्रवेशाने उत्तर महाराष्ट्रात शरद पवार गटाला धक्का बसला आहे.

**गुलाबराव देवकर, सतीश पाटील अजित पवार गटात**

चर्चगेट येथील के. सी. महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी बोलताना अजित पवार यांनी, बेरजेचे राजकारण करत आपण सर्व जाती धर्माच्या घटकांना सोबत घेऊन काम करूया, असे सांगताना सभासद नोंदणीच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला राज्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून उभा करण्याचे आवाहन केले.

आम्ही राजकारणात किंवा सार्वजनिक जीवनात जात-पात, धर्म कधी पाळला नाही. अठरा पगड पान १० वर